# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# औरंगाबाद परिमंडल, औरंगाबाद.

## प्रकरण क्र. सीजीआरएफ/एझेड/शहर/५९८/२०१६/२९

**(नोदंणी क्रमांक २०१६१०००२६)**

| | | |
|---|---|---|
| तक्रार दाखल | दिनांक :- | १५.१०.२०१६ |
| निकाल | दिनांक :- | १५.१२.२०१६ |

श्री. सिद्दीकी मो. अबुबकार मो. बिलान, — तक्रारदार
प्लॉट नं. ८०. पटेल नगर, अबरार कॉलनी,
औरंगाबाद ४३१००१.
(ग्राहक क्रमांक ४९००११५६०८०३)

## विरुध्द

कार्यकारी अभियंता (प्रशासन), — गैरअर्जदार
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .
शहर मंडल, औरंगाबाद.

## मंच

| | |
|---|---|
| १ ) डॉ.भास्कर पालवे | अध्यक्ष |
| २ ) श्री. उत्तम.म.उरकुडे | सदस्य / सचिव |
| ३ ) श्री. वि. सु काबरा | सदस्य |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

अर्जदार श्री. सिद्दीकी मो. अबुबकार मो. बिलान हे गैरअर्जदार कार्यकारी अभियंता, नोडल अधिकारी, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे ग्राहक असून (ग्राहक क्रमांक ४९००११५६०८०३) त्यांनी महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ च्या अनुसूची -अ मध्ये दिनांक १५-१०-२०१६ रोजी गैरअर्जदार यांचेवर तक्रार दाखल केली आहे. तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे आहे.

ग्राहकाने दिलेल्या तक्रारी नुसाार माहे जुलै २०१३ मध्ये व त्या अगोदर मीटर वाचक यांनी मीटरवरील रिडींग वाढवुन दिलेली असल्यामुळे मी संबंधीत कार्यालयात तक्रार केली असता मला अर्धे वीज बील भरणा केल्यानंतर तुमचे वीज बील दुरुस्त होईल असे सांगितले. म्हणुन मी जुलै २०१३ या महिन्याचे रुपये १३७५४.४१ पैकी रुपये ७०००/- चा भरणा केला आहे. परंतु माझे वीज बील दुरुस्त करण्याएवेजी वाढतच गेले. तसेच वीज बिलाची रक्कम कमी असून माहे सप्टेंबर २०१४ पासून ते आज पर्यंत व्याजाची रक्कम ही जास्तीती लावण्यात आलेली आहे.

माहे जून २०१६ मण्ध्ये अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, महावितरण, औरंगाबाद येथे तक्रार केली असता माहे मे २०१६ मध्ये (CPL) वीज बिलावरील रिडींग १४९४१ होती ती माहे जून २०१६ मध्ये ११०७१ प्रत्यक्षात मीटर वरील रिडींग घेण्यात आली. परंतु (१४९४१-११०७१) ३८७० जास्तीचे लावलेले युनिटचे पैसे व त्यावर लावण्यात आलेले व्याज कमी करण्यात आले नाही.

ग्राहकाने खालील प्रमाणे मागणी केली आहे. प्रत्यक्षात असलेल्या मीटर रिडींगचे विभागणी ६० महिन्यात करुन (माहे मे २०१३ ते माहे मे २०१६) तसेच माहे सप्टेंबर २०१४ पासून ते आजपर्यंत लावण्यात आलेली वीज बील कमी व व्याज आकारणी जास्त असल्यामुळे पुर्ण व्याज माफ करावे. सुधारीत वीज बिलात मी भरणा केलेले रुपये २४०००/- वजा करुन वीज बील देण्याचे आदेश द्यावेत.

३/-

**<u>कार्यकारी अभियंता (प्रशासन), नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे म्हणणे.</u>**

कार्यकारी अभियंता, शहर विभाग, महावितरण, शहर विभाग, औरंगाबाद यांनी आपले म्हणणे सादर केलेले नाही.

**<u>ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे निष्कर्ष</u>**

१) दिनांक २५.१०.२०१६, ०९.११.२०१६ रोजी अर्जदार गैरहजर होते. परंतु त्यांचे पुत्र विना परवाना उपस्थित होते.

२) दिनांक ३०.११.२०१६, ०७.१२.२०१६ व १५.१२.२०१६ रोजी अर्जदार व गैरअर्जदार दोघेही गैरहजर होते.

३) दिनांक १८.११.२०१६ चे सुनावणीमध्ये असे ठरले की, गैरअर्जदारांनी अर्जदाराचे समक्ष जून्या मिटरची चाचणी घेण्यात यावी व त्यानुसार बील दुरुस्ती करण्यात यावी व त्याची माहिती या मंचास सादर करावी. परंतु त्यानंतर दोन्ही पक्ष सुनावणीस सतत गैरहजर असल्याने दोन्ही पक्षास या तक्रारीमध्ये स्वारस्य नसल्याचे आढळले.

वरील प्रमाणे वस्तुस्थितीचा विचार करता मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# <u>आदेश</u>

१) अर्जदाराची तक्रार अमान्य करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | उत्तम.म.उरकुडे | विलासचंद्र.सु.काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य/सचिव |